Review Of Research
Vol.1,Issue.IX/June; 12pp.1-4 डॉ. केशव हरेल ISSN:-2249-894X

Research Papers

# शेतकऱ्यांच्या चळवळी

डॉ. केशव हरेल
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
पेठवडगांव,ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर

## प्रस्तावना :

शेतकऱ्यांच्या चळवळीचे कालमानानुसार आणि चळवळींचा स्वरूपानुसार वर्गीकरण करता येवू शकते. कालमानानुसार 1) 19 व्या शतकातील शेतकरी चळवळ 2) 20 व्या शतकातील स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी चळवळ 3) 20 व्या शतकातील स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चलवळी अशा ढोबळमानाने तीन कालखंडात शेतकरी चळवळीचे वर्गीकरण करता येईल ते पुढीलप्रमाणे –

### 1) 19 व्या शतकातील शेतकरी चळवळी :

1857 ते 1921 हा कालखंड म्हणजे शेतकरी चळवळीचा शुभारंभ होय. या वेलच्या चळवळी ह्या कधी ब्रिटीश राजवटीविरूद्ध तर कधी राजेरजवाड्यांनी, जमीनदारांनी डोईजड अशा कर लादण्याच्या विरूद्ध होते. या काळातील शेतकरी उठावाचे उद्दिष्ट ब्रिटीशांची हकालपट्टी करून पूर्वीचे सरकार परत आरणे व पूर्वीचे शेतीव्यवसाय पुनर्स्थापित करणे हे होते. या चळवळीत इतर शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. अशा प्रकारच्या 29 चळवळींची ऐतिहासिक कागदपत्रात नोंद आहे. यातील प्रमुख चळवळींचा विचार करूया.
1) महात्मा फुले यांची शेतकरी चळवळ 2) न्या. रानडे यांची सार्वजनिक सभा 3) काही शेतकरी उठाव – 1) पुनर्स्थापतावादी उठाव, (सन 1765 ते 1857) 2) धार्मिक उठाव 3) सामूहीक उठाव 4) महाराष्ट्रातील काही उठाव 1) कोळी व रामोशी यांचा उठाव (1826), भिल्लांचा उठाव (1822–1857), 1857 चा उठाव इत्यादी.

### 2) विसाव्या शतकातील स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी उठाव :

1. म. गांधी यांच्या नेतृत्वातील शेतकरी चळवळ – चंपारण्य–खेडा सत्याग्रह तसेच बार्डोली 2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शेतकरी चळवळ – स्वतंत्र पक्षाचा जाहीरनामा – ''आपला स्वतंत्र मजूर पक्ष जो शेतकरी वा कामकरी वर्गावर श्रीमंतांकडून जो जुलूम होतो, तो नाहीसा करण्यासाठीच स्थापन झाला आहे, काही महत्त्वपूर्ण चळवळी पुढील प्रमाणे –

1. चंपारण्य सत्याग्रह (1817–18)
2. खेडा सत्याग्रह – गुजरात (1919)
3. मोफल्यांचे बंड – मलबार (1921)
4. तेलंगणातील शेतकरी आंदोलन – हैद्राबाद (1921 ते 1945)
5. साताऱ्याचे बंड – महाराष्ट्र (1919–1921)
6. मुळशी पेट्यांचा सत्याग्रह (1920) पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील
7. बार्डोली सत्याग्रह – गुजरात (1928)
8. अवध साराबंदी चळवळ – उत्तरप्रदेश (1930)
9. किसान सभेची चळवळ (1936)
10. वारल्यांचा लढा (1945–46)
11. तेभागा चळवळ (1946–47) बंगालमधील दिनापूर जिल्ह्यातील अतवारी गावात प्रथम सुरू झाली.

Please cite this Article as : डॉ. केशव हरेल, शेतकऱ्यांच्या चळवळी : Review Of Research (JUNE ; 2012)

### *3) स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळ*
### *स्वातंत्र्यानंतरच्या प्रमुख चळवळी –*

स्वातंत्र्य प्राप्तीच्या थोड्या अगोदर व काहीशा नंतरच्या कालावधीत कॉंग्रेस पक्षाव्यतिरिक्त डाव्या पक्षांनी विशेषतः भारतीय कम्युनिस्ट पक्षाने काही आंदोलने चालविली. त्यातील तीन महत्त्वाची आंदोलने म्हणजे तेभागा, वारली व तेलंगणा चळवळ होय. फुले–शाहू, आंबेडकर, महर्षी शिंदे यांना अपेक्षित असणारी ग्रामीण अर्थव्यवस्था निर्माण होत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. नंतरच्या काळात शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली (1949) त्यांनी शेतकनंचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. या काळातील काही प्रमुख चळवळी पाहूया. 1. नक्षलवादी चळवळ 2. डाव्या पक्षांच्या चळवळी – अ) भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या किसान सभेची चळवळ ब) शेतकरी कामगार पक्षाची चळवळ क) लाल निशाण पक्षाचे आंदोन ड) पालघर तालुक्यातील भूमिसेना आंदोलन इ) शेतकरी संघटनेची चळवळ – पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात 1978 मध्ये शरद जोशी यांनी शेतकरी आंदोलनास सुरूवात केली. शेतकरी संघटनेची तत्वप्रणाली पुढील मुद्यांच्या आधारे मांडता येईल. – इंडिया विरूद्ध भारत, शेतमालाला रास्तभाव – सर्व शेतकरी वर्गासाठी मागणी.

### *शेतकरी चळवळीची प्रमुख आंदालने –*

1) कांदा आंदोलन (मार्च 1980)
2) ऊस आंदोलन – नाशिक जिल्हा (ऑगस्ट ते नोव्हेंबर 1980)
3) निपाणी तंबाखू आंदोलन कर्नाटक (मार्च 1981)
4) दूध आंदोलन (जून 1982)
5) परभणी येथील अधिवेशन (फेब्रुवारी 1984)
6) चंदिगडच्या राजभवनावर पिकेटिंग (मार्च 1984)
7) कापूस आंदोलन – अ) चांदवड येथील महिला अधिवेशन (9–10 नोव्हेंबर 1986) ब) कापूस आंदोलन (नोव्हेंबर–डिसेंबर 1986)
8) कर्जमुक्ती आंदोलन (1988–89)
9) नागपूर येथील शेतकरी मेळावा

### *शेतकऱ्यांच्या आत्महत्या व शेतकरी चळवळ :*

जगातील हरितक्रांतीचे जनक म्हणून डॉ. नोरमन बोस्लॉग यांना ओळखले जाते. भारताच्या हरितक्रांतीचे जनक म्हणून डॉ. एम. एस. स्वामिनाथन तर महाराष्ट्राचे हरितक्रांतीचे जनक म्हणून वसंतराव नाईक याचा नामोलेख केला जातो. त्यांची प्रेरणा घेऊन भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी दुसऱ्या हरितक्रांतीची घोषणा 26 जानेवारी 2005 रोजी केली होती. तरी सुद्धा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे. 18 मे 2006 रोजी लोकसभेत विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना भारताचे कृषिमंत्री शरद पवार यांनी सांगितले होते की, 1995 ते 2002 या नऊ वर्षांच्या काळात ग्रामीण भागात तब्बल 1,37,322 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती संसदेसमोर मांडली. तर अगदी सरकारी आकडेवारीनुसार 1995 ते 2007 या काळात देशातील दोन लाखाहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्येच्या मार्गाने आपली जीवनयात्रा संपविली. त्यातही विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय आहे.

### *समारोप :*

शेतकऱ्यांचे खचलेले मनोधैर्य, सावकारी कर्ज, जागतिकीकरण, शेतमालाच्या किमतीत घट, किंमत व उत्पादन खर्चातील तफावत, कौटुंबिक उदासीनतेचे वातावरण, शेतमालाची कमी किंमतीला होणारी आयात, अपुरी सिंचन व्यवस्था, निसर्गाची अवकृपा, कुशल राजकीय नेतृत्वाचा अभाव, पाश्चात्य संस्कृतीच्या अभावाने बळकावलेला ग्रामीण भागातील व्यक्तिवाद, नियोजनकर्त्यांचे शेतीक्षेत्राकडे दुर्लक्ष, बँकांची नफेखोरी वृत्ती, शेतकऱ्यांमधील अशिक्षितपणा, शासकीय मदतीच्या मार्गातील औदासीन्य, महत्त्वपूर्ण समस्यांवर जुजबी इलाज इत्यादी समस्यांमुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत आहेत. अशा परिस्थितीत शेतकरी चळवळी ग्रामीण स्तरावर लोकांच्या संपर्कात राहून तणावशोषण यंत्रणेच्या स्वरूपात काही योगदान देवू शकतील काय?याचाही विचार महत्वाचा ठरतो. परंपरागत स्वरूपाच्या तणावशोषण यंत्रणांचे विघटन झाले, परंतु त्याची जागा घेण्यास नवीन यंत्रणा मात्र निर्माण झाल्या नाहीत. ही उणीव भरून काढणाऱ्या यंत्रणा समोर येणे गरजेचे आहे. ही जागा शेतकरी चळवळी घेतील काय? हा प्रश्न महत्वाचा ठरतो.

### *संदर्भ :*

***1) डॉ. बी. एम. कऱ्हाडे*** – सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र, प्रकाशक : मनोहर पिंपळापुरे, जून 2011.
***2) तुकाराम जाधव / मल्हार पाटील*** – सुवर्ण महोत्सवी वर्ष, महाराष्ट्र वार्षिकी 2010, प्रकाशक : युनिक ॲकॅडमी.
***3) भास्कर लक्ष्मण भोळे / किशोर बेडकीहाळ*** – बदलता महाराष्ट्र (साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा), डॉ. एन. डी. पाटील गौरवग्रंथ, प्रकाशक : आंबेडकरी अकादमी, सातारा, 16 जुलै 2003.
***4) घनश्याम शहा, अनुवाद : प्राची चिकटे*** – भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2011.

**Please cite this Article as :** *डॉ. केशव हरेल*, *शेतकऱ्यांच्या चळवळी* **: Review Of Research (JUNE ; 2012)**